नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १८० Issue - 180 | वार - शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २०२६ Blow- Friday Date 27 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

संसदेच्या विशेष अधिवेशनाची तयारी

३० नोव्हेंबरला लोकसभेची आणि २ डिसेंबरला राज्यसभेची बैठक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : सरकारनं संसदेच्या दोन्ही सभागृहांची बैठक बोलावली आहे. ३० नोव्हेंबरला लोकसभेची आणि २ डिसेंबरला राज्यसभेची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकांमध्ये सरकार आवश्यक कामकाज पूर्ण करणार आहे. संसदेच्या या बैठका पावसाळी अधिवेशनाच्या पुढील कामकाजाचा भाग असतील. संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी गुरुवारी याबद्दलची माहिती दिली आहे.



संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजात विरोधी पक्षाच्या खासदारांच्या गोंधळामुळे अनेकदा अडथळा आला होता. यानंतर १३ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही सदनांचं कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आलं. या अधिवेशनाचा अधिकृत समारोप झाला नव्हता. त्यामुळे राजकीय वाद उफाळला. हिवाळी अधिवेशन बोलावण्यासाठी सरकार करत असलेला उशीर आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनांशी संबंधित समीकरणांची जुळवाजुळव यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरलं. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. अधिवेशन बोलावण्याचा आणि स्थगित करण्याचा घटनात्मक अधिकार सरकारला असल्याचं उत्तर सत्ताधाऱ्यांकडून देण्यात आलं होतं. या सगळ्या पार्श्वभूमीवर येत्या आठवड्यात होणाऱ्या बैठका वादळी ठरण्याची शक्यता आहे.

आता सरकारनं लोकसभा आणि राज्यसभेची बैठक पुन्हा बोलावण्याची तयारी केली आहे. केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी याबद्दलची माहिती दिली आहे. लोकसभेची बैठक ३० नोव्हेंबर २०२६ रोजी, तर राज्यसभेची बैठक २ डिसेंबर २०२६ रोजी होईल. दोन्ही सदनांचं कामकाज ३ डिसेंबपर्यंत सुरू राहू शकतं. सरकारनं बोलावलेली लोकसभेची आणि राज्यसभेची बैठक पावसाळी अधिवेशनाचाच भाग असल्याचं रिजिजू यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये नमूद केलं आहे. याचा अर्थ पुढील आठवड्यातील कामकाजाला नवं अधिवेशन मानलं जाणार नाही. सरकारनं लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती यांना दोन्ही सदनांचं कामकाज सुरू करण्याची विनंती केली आहे. गरजेच्या सरकारी कामकाजांचा निपटारा करण्यासाठी बैठका बोलावण्यात आल्याचं रिजिजू यांनी सांगितलं आहे. कामकाजांच्या गरजा पाहता दोन्ही सदनांच्या बैठका ३ डिसेंबरपर्यंत संपू शकतात, असंही रिजिजू म्हणाले आहेत. संसदेच्या विशेष अधिवेशनात मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडलं जाण्याची दाट शक्यता आहे.

राज्यात १७४ नव्या डिजिटल सेवांचा शुभारंभ!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राज्यातील शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पारदर्शक, गतिमान आणि मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया पुनर्रचना (जी-पीआर) उपक्रमाला अधिक गती द्यावी. सरकारी कार्यालयात खेटे घालणं, फाईल अडकणं, पुन्हा पुन्हा कागदपत्रं मागणं, हे चित्र आता बदलायचं आहे. येत्या २६ जानेवारीपर्यंत लोकांना डिजिटल पद्धतीने सरकारी सेवा मिळण्याचा वेगळा अनुभव द्यायचा आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केलं. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १७४ नव्या डिजिटल सेवांचं लोकार्पण झालं. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गेल्या दीड-दोन वर्षांपासून सरकार हेच करतंय की योजना लोकांपर्यंत सहज पोहोचाव्यात. पारदर्शकता, वेग आणि जबाबदारी, या तीन गोष्टींवर आमचा भर आहे. आमचं ध्येय आहे 'झिरो ब्युरोक्रसी' म्हणजे कामात अडथळे नकोत, माणसावर अवलंबून राहण्याची गरज नको. राज्यात एकूण ११२९ सरकारी प्रक्रिया सोप्या करण्याचं ठरलं होतं. त्यातल्या ३९७ प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत, म्हणजे जवळपास ३५ टक्के काम झालंय. आज सुरू झालेल्या १७४ सेवांमध्ये मैत्री २.० वरच्या ७६, आपले सरकार २.० वरच्या ७४ आणि महाडीबीटी २.० वरच्या २४ सेवांचा समावेश आहे. या डिजिटल बदलामुळे आता विनाकारण प्रतिज्ञापत्र द्यावं लागणार नाही. वारंवार तीच कागदपत्रं मागितली जाणार नाहीत. पेपरलेस कारभाराकडे वाटचाल होणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घालावं, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

आज आरटीएस २.०, महाडीबीटी २.०, मैत्री २.०, महाउपलब्धी यासारख्या अनेक प्रणाली सुरू झाल्या. महाउपलब्धीमुळे आता पेन्शनधारकांना मोबाईलवरूनच डिजिटल जीवन प्रमाणपत्र बनवता येणार आहे. त्यासाठी ऑफिसात जाऊन हयात असल्याचं दाखवावं लागणार नाही. याच कार्यक्रमात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी ग्रामीण तरुणांसाठी एक नवी योजना जाहीर केली. अंडी, दूध, पोल्ट्री, मांस, शेळीपालन, वराहपालन यातून गावातल्या तरुणांना उद्योजक बनवायचं आहे. ही योजना पूर्ण ऑनलाइन असेल. सर्वसाधारण लोकांना ५० टक्के, तर महिला आणि डउ-डढ प्रवर्गाला ७५ टक्के अनुदान मिळणार आहे. २४ डिसेंबरपर्यंत अजून काही महत्त्वाच्या सेवा सुरू होणार आहेत आणि ३१ डिसेंबरपर्यंत सगळं तांत्रिक काम पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम २०२७ पर्यंत पूर्ण करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील स्मारकाचे उर्वरित काम गतीने पूर्ण करून हे स्मारक २०२७ पर्यंत पूर्ण करावे. त्यासाठी कंत्राटदाराने सुधारित कामाची कालमर्यादा निश्चीत करून उच्चाधिकार समितीकडे तसा अहवाल सादर करावा. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) या कामाच्या प्रगतीवर दररोज नियंत्रण ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सुधारित कामाचा आराखडा उच्चाधिकार समितीकडे सादर करण्याचे निर्देश

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्मारकाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी प्रकल्पाची सद्यस्थिती, स्ट्रक्चरल स्टीलचे फॅब्रिकेशन, ब्रॉन्झ क्लॅडिंग, बांधकामाची गुणवत्ता, कंत्राटदाराच्या अतिरिक्त आर्थिक मागण्या आणि काम पूर्ण करण्याच्या कालमर्यादेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कामातील दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही

स्मारकाचे काम अपेक्षित गतीने पूर्ण होत नसल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. कंत्राटातील अटी व शर्तींचे पालन करून काम पूर्ण करणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. आर्थिक मागण्यांमुळे काम थांबविणे योग्य नसून, कामातील दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. संबंधित एजन्सीची काम पूर्ण करण्याची क्षमता आणि बांधिलकी तपासून आवश्यकतेनुसार पर्यायी एजन्सी नियुक्त करण्यासह कठोर कारवाईच्या पर्यायांचाही विचार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



आर्थिक दाव्यांची छाननी करून नियमानुसार निर्णय

कंत्राटातील तरतुदी, जीएसटी दरातील बदल, दरवाढ निर्देशांक आणि अतिरिक्त कामांमुळे निर्माण झालेल्या खर्चाची तांत्रिक व आर्थिक पडताळणी करावी. जीएसटी दरातील बदलाबाबत कंत्राटातील तरतुदींनुसार कायदेशीर अभिप्राय घ्यावा. ब्रॉन्झ क्लॅडिंगसाठी आवश्यक साहित्य खरेदी करता यावे, यासाठी बँक हमीच्या आधारे आगाऊ रक्कम देण्याच्या प्रस्तावाची तपासणी करावी. सर्व आर्थिक प्रस्ताव एकत्रितपणे समितीसमोर ठेवून नियमानुसार निर्णय घ्यावा, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक हा जनभावनेशी निगडित महत्वाचा प्रकल्प आहे. त्यामुळे या कामाकडे केवळ एक प्रकल्प म्हणून न पाहता त्याचे सामाजिक महत्व लक्षात घेऊन सर्वांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे, असे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

सुप्रीम कोर्टाचे एफएसएसएआयला मोठे निर्देश

पॅकेटबंद खाद्यपदार्थांवर 'हाय फॅट, शुगर, सॉल्ट'चा इशारा देणारा षटकोन छापा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पॅकेटबंद खाद्यपदार्थांमध्ये मीठ, साखर आणि सॅचुरेटेड फॅटचे प्रमाण अधिक असल्यास आता ग्राहकांना पॅकेटवरच धोक्याचा इशारा देणारे लेबल दिसणार आहे. सर्वोच्च न्यायालयानं भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाला याबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वं आणि नियम तयार करण्याचे आदेश दिले आहेत. केवळ वरुन मिसळलेली साखर किंवा फॅट नव्हे, तर खाद्यपदार्थात असलेली एकूण साखर आणि सॅचुरेटेड फॅट यालाच इशाऱ्याचा निकष मानण्यात यावं, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठानं सांगितलं की, मीठ, एकूण साखर आणि सॅचुरेटेड फॅटची कमाल मर्यादा नव्याने निश्चित केली जावी. इशाऱ्यासाठी ठरवलेली मर्यादा इतकी कमी नसावी की प्रत्येक पॅकेटवरच इशारा छापावा लागेल आणि इतकीही जास्त नसावी की आरोग्याला हानी पोहोचवणारे प्रमाण त्यातून सुटून जाईल.

सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्देशांनुसार, खाद्यपदार्थाच्या पॅकेटच्या मुख्य दर्शनी भागावर ३ स्वतंत्र षटकोन तयार करावेत. त्यामध्ये अनुक्रमे High Fat, Hi सह Sugar आणि High Salt असे स्पष्टपणे लिहिले जावे.

प्रत्येक षटकोन पॅकेटच्या मुख्य क्षेत्राच्या किमान ४ ते ५ टक्के जागा व्यापेल, याची काळजी घ्यावी. या षटकोनांमध्ये लिहिलेल्या शब्दांचा फॉन्ट इतका मोठा आणि स्पष्ट असावा की सर्वसामान्य ग्राहकांना तो सहज वाचता येईल. मुले आणि सर्वसामान्य नागरिकांना पॅकेटबंद खाद्यपदार्थांतील पोषक घटक आणि त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत जागरूक करणं अत्यंत गरजेचं असल्याचं खंडपीठानं अधोरेखित केलं. या निर्देशांच्या आधारे FSSAI ने मसुदा नियम तयार करावेत आणि संबंधित घटकांकडून सूचना व हरकती मागवाव्यात, असं कोर्टाने सांगितलं. तसेच हे नियम लवकरात लवकर अंतिम करून अधिसूचित करावेत, असंही स्पष्ट केलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० आठवड्यांनंतर होणार असून, मसुदा नियम तयार झाले आहेत की नाही, याची माहिती कोर्ट त्यावेळी घेईल.

हे प्रकरण फ्रंट ऑफ पॅकेट वॉर्निंग लेबल लागू करण्याशी संबंधित आहे. पॅकेटबंद खाद्यपदार्थांमध्ये मीठ, साखर आणि फॅटचे अधिक प्रमाण असल्यास ग्राहकांना स्पष्ट इशारा मिळावा, या मागणीसाठी '३ड अँड अवर हेल्थ सोसायटी' या संस्थेने याचिका दाखल केली होती. ही व्यवस्था लागू करण्यात होत असलेल्या दिरंगाईवरून सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही ऋड्डअख ला चांगलेच खडसावलं होतं.

गोरे विरुद्ध मोहिते-पाटील प्रतिष्ठेची लढत

नऊ जागांसाठी २,५९६ मतदार बजावणार मतदानाचा हक्क; आज मतमोजणी

सहकार की स्वाभिमानी? डीसीसी बँकेच्या सत्तासंघर्षाचा आज फैसला

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर व्हिजन सोलापूर : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार, याचा फैसला करण्यासाठी आज गुरुवारी मतदान होत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि मोहिते-पाटील यांच्यातील राजकीय वर्चस्वाची ही लढाई आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. भाजप व मित्रपक्ष पुरस्कृत सहकार विकास पॅनेल आणि मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखालील स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनेल यांच्यात नऊ जागांसाठी थेट राजकीय संघर्ष रंगणार आहे. या निवडणुकीत २ हजार ५९६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, शुक्रवारी (ता. २७) होणाऱ्या मतमोजणीनंतर जिल्हा बँकेतील सत्तेचे समीकरण स्पष्ट होणार आहे.

सहकार विकास पॅनेल 'कपबशी', तर स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनेल 'शिट्टी' या निवडणूक चिन्हावर रिंगणात आहे. दोन्ही पॅनेलने विजयासाठी ताकद पणाला लावली असून, या निवडणुकीकडे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. विशेषतः माळशिरस आणि सांगोला मतदारसंघांतील लढती प्रतिष्ठेच्या मानल्या जात आहेत. या निकालाचा परिणाम जिल्ह्यातील आगामी सहकार आणि राजकीय समीकरणांवर होण्याची शक्यता आहे.

आज गुरुवारी सकाळी आठ ते सायंकाळी चार या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मतदारांसाठी शहरातील रंगभवन चौकाजवळील समाजकल्याण केंद्रातील सभागृहात मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अक्कलकोट येथे स्वामी समर्थ सहकारी बँकेत, बार्शी येथे जिल्हा परिषद, करमाळा येथे पंचायत समिती, माळशिरस येथे आदर्श कन्या प्रशाला, माढा येथे सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय, मोहोळ येथे बाजार समितीच्या गटसचिवांच्या सभागृहात, पंढरपूर येथे बाजार समिती मार्केटमध्ये आणि सांगोला येथे पंचायत समितीच्या बचत भवनात मतदान होणार आहे.



माळशिरस, सांगोल्यात प्रतिष्ठेची लढाई

या निवडणुकीत माळशिरस आणि सांगोला मतदारसंघांकडे विशेष लक्ष लागले आहे. दोन्ही गटांनी या मतदारसंघांत विजयासाठी रणनीती आखली आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लढतीत राजेंद्र बंदीछोडे आणि अनिकेत देशमुख यांच्यातील सामना लक्षवेधी ठरणार आहे. राजेंद्र बंदीछोडे यांना मोहिते-पाटील गटाचे पाठबळ असल्याचे मानले जात आहे, तर अनिकेत देशमुख हे बँकेचे उपाध्यक्ष चंद्रकांत देशमुख यांचे पुत्र आहेत. त्यामुळे या लढतीत कोण बाजी मारणार, याबाबत उत्सुकता आहे.

मतदारसंघनिहाय वेगवेगळ्या रंगांच्या मतपत्रिका

मतदान प्रक्रियेत सुसूत्रता राखण्यासाठी मतदारसंघनिहाय वेगवेगळ्या रंगांच्या मतपत्रिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. विकास संस्था प्रतिनिधींसाठी पांढऱ्या, महिला प्रतिनिधींसाठी गुलाबी, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी निळ्या, तर विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठी पिवळ्या रंगाची मतपत्रिका असेल.

कृषी पणन संस्था व शेतीमाल प्रक्रिया संस्थांच्या प्रतिनिधींसाठी निळ्या कागदावर लाल छपाई असलेली, दुग्ध संस्था व व्यक्ती सभासदांच्या प्रतिनिधींसाठी पिवळ्या कागदावर लाल छपाई असलेली, तर नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या प्रतिनिधींसाठी फिकट हिरव्या रंगाची मतपत्रिका दिली जाणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मतपत्रिकांच्या प्रकारांची माहिती देणारा स्वतंत्र फलक लावण्यात आला आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी दिली.

निवडणूक रिंगणातील उमेदवार

- माळशिरस सोसायटी मतदारसंघ : शहाजीराव देशमुख, ज्ञानराज पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील

- सांगोला सोसायटी मतदारसंघ : संजय इंगोले, डॉ बाबासाहेब देशमुख

- महिला मतदारसंघ (दोन जागा) : अस्मिता गायकवाड, नीता गुंड, अर्चना घाडगे, सिंधू पाटील, शामल बागल, रुक्मिणी रणदिवे.

- अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघ : महादेव कांबळे, दत्तात्रय खडतरे.

- विमुक्त जाती-भटक्या जमाती-विशेष मागास प्रवर्ग : श्रीधर कौंडले, अनिकेत देशमुख, राजेंद्र बंदीछोडे.

- कृषी पणन संस्था व शेतीमाल प्रक्रिया संस्था मतदारसंघ : संग्रामसिंह जहागिरदार, रणजित शिंदे.

- इतर शेती संस्था मतदारसंघ : शिवाजी पाटील, सूर्यादित्य साळुंखे.

- नागरी सहकारी बँका व इतर संस्था मतदारसंघ : श्रीधर कौंडले, राजेंद्र गंगदे, मनीष देशमुख, अमोल शिंदे.

निवडणुकीतील ठळक आकडे
एकूण जागा : १९
निवडणूक लागलेल्या जागा : ९
मतदारसंख्या : २,५९६

केंद्रनिहाय मतदार संख्या

मतदान केंद्र	मतदार
दक्षिण सोलापूर	१०८
उत्तर सोलापूर	३१७
अक्कलकोट	१३६
बार्शी	२१४
करमाळा	१६५
माळशिरस	३२२
माढा	४३७
मंगळवेढा	१२२
मोहोळ	१९३
पंढरपूर	३५१
सांगोला	२२१
एकूण	२,५९६

मतदान : गुरुवार, २६ नोव्हेंबर
मतमोजणी : शुक्रवार, २७ नोव्हेंबर
मतमोजणीचे ठिकाण : शिवदारे सभागृह

संपादकीय....

महत्त्वाकांक्षी योजना

निसर्गाची अनियमितता, सततची दुष्काळी परिस्थिती, शेतीमालाला मिळणारा कमी बाजारभाव आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना आता उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध करून देण्याच्या दिशेने राज्य शासनाने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शेतीवरील आर्थिक अवलंबित्व कमी करून शेतकऱ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढील पाच वर्षांत (२०२७ ते २०३१) अनाथांचा नाथ.. दुष्काळग्रस्त शेतकरी रिक्षा सन्मान योजनेंतर्गत तब्बल १ लाख प्रवासी ऑटो रिक्षांचे वाटप करण्याची महत्वाकांक्षी योजना लागू करण्यात येत असल्याची घोषणा नुकतीच परिवहनमंत्र्यांनी केली. पुढील वर्षी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवशी म्हणजे ९ फेब्रुवारी २०२७ रोजी पात्र शेतकऱ्यांना रिक्षाची चावी देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्याने राज्य शासनाच्या परिवहन विभाग आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळामार्फत 'अनाथांचा नाथ दुष्काळग्रस्त शेतकरी रिक्षा सन्मान योजना' राबविण्यात येणार असून, या योजनेचा लाभ दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी कुटुंबांना मिळणार आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे रिक्षा खरेदीसाठी लाभार्थ्यांना वाहनांच्या एकुण किंमतीच्या १० टक्के रक्कम कल्याणकारी मंडळाच्या वतीने अनुदान स्वरूपात उभी करण्यात येणार असून, उर्वरित ९० टक्के रक्कम राष्ट्रीयीकृत बँका, अनुसूचित बँका किंवा अन्य वित्तीय संस्थांच्या माध्यमातून कर्जस्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी कुटुंबांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणार आहे.

चूल आणि मूल सांभाळत नागपूरची तरुणी मृणाली वासमवारची बुरुड समाजावर पीएच.डी.; वडिलांच्या कष्टातून घेतली प्रेरणा, नवीन संशोधकांसाठी भक्कम आधार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अनुसूचित जातीत असलेल्या बुरुड समाजाच्या व्यवसायावर पीएच.डी. मिळवणाऱ्या नागपूर येथील डॉ.मृणाली चंदेवार (वासमवार) बुरुड समाजातील पहिल्याच व्यक्ती ठरल्या आहेत.ही बाब अत्यंत भूषणावह व कौतुकास्पद आहे.डॉ. मृणाली चंदेवार (वासमवार).

मर्यादित संदर्भ साहित्यावर मात करत त्यांनी नवीन संशोधकांसाठी भक्कम आधार उभा केला आहे.त्यांनी वडिलांच्या कष्टातून प्रेरणा घेतली आहे.

बुरुड समाजाच्या पारंपरिक व्यवसायातील आर्थिक व सामाजिक प्रश्नांचा संशोधनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करून डॉ.मृणाली सुधीर चंदेवार (सासरचे नाव : डॉ. मृणाली ललित वासमवार) यांनी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत 'बिझनेस इकॉनॉमिक्स' विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. बुरुड समाजातून स्वतःच्या समाजाच्या पारंपरिक व्यवसायावर पीएच.डी. मिळवणाऱ्या डॉ. मृणाली या समाजातील पहिल्याच व्यक्ती ठरल्या आहेत. वयाच्या अवघ्या २९व्या वर्षी त्यांनी हे यश मिळवले असून, माहेरच्या (चंदेवार) कुटुंबातीलही त्या पहिल्या पीएच.डी. पदवीधारक ठरल्या आहेत.

डॉ.मृणाली यांनी एम.कॉम.च्या अंतिम परीक्षेत गोंडवाना विद्यापीठातून तृतीय क्रमांक पटकावला होता.या यशानंतर त्यांनी उच्च शिक्षण व संशोधनाचा ध्यास घेतला.सन २०२० मध्ये वयाच्या २५व्या वर्षी त्यांनी पीएच.डी.साठी प्रवेश घेतला आणि २२ जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठात आपला संशोधन प्रबंध सादर केला.संशोधनाचे सर्व टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर ३० सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठाकडून त्यांच्या पीएच.डी.ची अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली. त्यानंतर १५ नोव्हेंबर २०२६ रोजी गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या १४व्या दीक्षांत समारंभात महाराष्ट्राचे राज्यपाल . श्री.जिष्णू देव वर्मा व मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रमुखांच्या हस्ते त्यांना पीएच.डी.पदवी प्रदान करण्यातआली. भविष्यातील संशोधकांसाठी महत्त्वाचा संदर्भ दस्तऐवज ठरणारा

त्यांच्या संशोधनाचा विषय चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील बुरुड व्यावसायिकांच्या आर्थिक स्थिती-चे तुलनात्मक अध्ययन : एक अभ्यास (कालावधी २०१० ते २०२०) हा आहे. बुरुड समाजाच्या पारंपरिक व्यवसायावर आजवर शास्त्रीय स्वरूपाचे संदर्भ साहित्य अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध होते.या मर्यादित साहित्यावर मात करत डॉ.मृणाली यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण केले.त्यांच्या या सखोल संशोधनामुळे भविष्यात या विषयावर अभ्यास करणाऱ्या नवीन संशोधकांना, विद्यार्थ्यांना आणि शासनाच्या धोरणकर्त्यांना एक भक्कम अधिकृत आधार व दिशा मिळणार आहे.या संशोधनातून त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्यविकास प्रशिक्षण,आर्थिक सहाय्य आणि हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित केली आहे.



कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत गाठले यशाचे शिखर

डॉ.मृणाली यांचे वडील स्वतः बुरुड व्यावसायिक होते. लहानपणापासूनच त्यांनी आई-वडिलांचे कष्ट,बांबू व्यवसायातील आर्थिक अडचणी आणि बाजारपेठेतील समस्या जवळून अनुभवल्या होत्या; त्यातूनच त्यांना या संशोधनाची प्रेरणा मिळाली.२०२० मध्ये पीएच.डी.ला प्रवेश घेतल्यानंतर २०२१ मध्ये त्यांचा विवाह नागपूर येथील ललित वासमवार यांच्याशी झाला,तर २०२३ मध्ये त्या मातृत्वाच्या भूमिकेत आल्या. संसार,पती ललित वासमवार,सासूबाई आणि लहान मुलाची जबाबदारी सांभाळत त्यांनी संशोधनाचे कार्य अविरत सुरू ठेवले. या प्रवासात त्यांना संशोधन मार्गदर्शक डॉ. सपना आर. वेगीनवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.यशाच्या आनंदात वडिलांच्या आठवणीने त्यांचे मन हेलावले आहे.या यशाच्या आनंदात एक मोठी खंतही त्यांच्या मनात आहे.चार महिन्यांपूर्वीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. ज्या वडिलांनी स्वतः बांबू व्यवसाय केला, त्याच व्यवसायावर मुलीने संशोधन करून पीएच.डी. मिळवली; मात्र हे यश पाहण्यासाठी आज ते हयात नसल्याची खंत त्यांच्या मनात आहे. डॉ.मृणाली यांनी बारावीत असल्यापासून पीएच.डी. करण्याचे स्वप्न पाहिले होते,ते आज पूर्ण झाले. मात्र त्यांचे वडील आज त्यांच्यासोबत नाहीत, ही आयुष्यभराची खंत त्यांना लागून राहिली आहे. त्यांनी दिलेले संस्कार आणि कष्टाची शिकवण यामुळेच त्या इथवर पोहोचू शकल्या. त्यांच्या संशोधनातून बुरुड समाजासाठी काहीतरी योगदान देता आले व पुढील संशोधकांसाठी मार्ग खुला करता आला, याचा त्यांना विशेष आनंद आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील या ऐतिहासिक कामगिरीबद्दल चंद्रपूर (माहेर) व नागपूर (सासर) येथील कुटुंबीय, प्राध्यापकवर्ग, मित्रपरिवार आणि संपूर्ण बुरुड समाजातील नागरिकांकडून डॉ. मृणाली चंदेवार (वासमवार) यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.त्यांचे संशोधन हे भविष्यातील संशोधकांसाठी महत्त्वाचा संदर्भ दस्तऐवज ठरणार आहे.बुरुड समाजाच्या पारंपरिक व्यवसायावर आजवर शास्त्रीय स्वरूपाचे संदर्भ साहित्य अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध होते.या मर्यादित साहित्यावर मात करत डॉ. मृणाली यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण केले.त्यांच्या या सखोल संशोधनामुळे भविष्यात या विषयावर अभ्यास करणाऱ्या नवीन संशोधकांना, विद्यार्थ्यांना आणि शासनाच्या धोरणकर्त्यांना एक भक्कम अधिकृत आधार व दिशा मिळणार आहे. या संशोधनातून त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्यविकास प्रशिक्षण,आर्थिक सहाय्य आणि हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यांच्या या उच्चस्तरीय शैक्षणिक प्रगतीने बुरुड समाजाच्या यशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.त्यामुळे या ऐतिहासिक कामगिरीबद्दल त्यांचे व त्यांच्या परिवाराचे तमाम बुरुड समाजबांधवातर्फे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या पुढील वाटचालीस लाख लाख हार्दिक शुभेच्छा!

लेखक: दशरथ वडतिले
माजी अध्यक्ष, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ मो.९४२२४५७१००

व्यवस्था बदलण्याचे काम संविधानाने केले : नुरखान पठाण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. अगदी दैनंदिन जीवनात सुद्धा छोट्या मोठ्या वर्तन व्यवहारात संविधानाचा अमल होतो. संविधानाने खऱ्या अर्थाने व्यवस्था बदलण्याचे काम केले आहे,असे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक नूरखान पठाण यांनी केले. संविधान दिनानिमित्त बार्टीमध्ये आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, तथागत गौतम बुद्धांनी अडीच हजार वर्षांपूर्वी समतेची पायाभरणी केली.



या देशात विषमता होती. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानद्वारे या देशातील वंचित- उपेक्षित समाजाला, महिलांना समानतेचे हक्क बहाल करून या देशातील व्यवस्था बदलण्याचे काम केल्याचे मतही त्यानी व्यक्त केले.

बार्टीच्या वतीने संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रम

अध्यक्षस्थानी बार्टीच्या निबंधक डॉ सुचिता शिंदे या होत्या. विभाग प्रमुख डॉ बबन जोगदंड,रविंद्र कदम, शुभांगी पाटिल, लेखाधिकारी नितीन चव्हाण, माजी न्यायमूर्ती यशवंत चावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना नुरखान पठाण म्हणाले की, बार्टी हि संविधानाचा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करणारी देशातील महत्वपूर्ण संस्था असुन संविधान जनजागृतीचे बार्टीचे कार्य उल्लेखनीय असल्याचे गौरवोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले.

संविधान प्रास्ताविकेचे वाचन निबंधक डॉ सुचिता शिंदे यांनी केले. संविधान जनजागृतीचे कार्य केल्याबद्दल प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, प्रकल्प अधिकारी सुनंदा गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते संविधानाची प्रत, व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी केले. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. यावेळी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

संविधान दिनी भीम प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम; वाडिया हॉस्पिटल ट्रस्टपासून अभियानाची सुरुवात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून भीम प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या वतीने एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त एन. एम. वाडिया हॉस्पिटल ट्रस्टला भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची आकर्षक फोटो फ्रेम तसेच संविधानाचे पुस्तक भेट देण्यात आले.



भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत व्हावा, या उद्देशाने भीम प्रतिष्ठानतर्फे संविधानाच्या प्रास्ताविकेच्या फ्रेमचे विविध संस्था आणि संघटनांना वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात एन. एम. वाडिया हॉस्पिटल ट्रस्टपासून करण्यात आली.

याप्रसंगी एन. एम. वाडिया हॉस्पिटल ट्रस्टचे सचिव श्री. शिरीष गोडबोले, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल, प्रशासकीय अधिकारी श्री. सचिन देशपांडे, गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. घुली, श्री. संजय पटेल, ड. हबीब तसेच श्री. रंगनाथजी बंकापूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

एन. एम. वाडिया हॉस्पिटल ट्रस्टला संविधानाच्या प्रास्ताविकेची फ्रेम व संविधान पुस्तक भेट

भीम प्रतिष्ठानचे संस्थापक दलितमित्र बाबा बाबरे, अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, सचिव अकबर शेख, रंजन, कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते.

संविधानाचे महत्त्व जनमानसात रुजविणे, संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करणे आणि संविधानाचा संदेश समाजातील विविध संस्था व संघटनांपर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे भीम प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे यांनी केले तर आभार अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी मानले.

रामदास वाजे सर यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त....

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. रामदास विष्णू वाजे सर हे मविप्र समाज संस्थेतील ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत

शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांचा सेवापूर्ती सोहळा कार्यक्रम स्वर्गीय बाळाजी गणपत वाजे सांस्कृतिक सभागृह डुबेरे या ठिकाणी आयोजित केला आहे त्यानिमित्ताने.....

समाजात काही माणसे ही जन्मताच मोठी असतात तर काही माणसे आपल्या स्व कर्तुत्वाने मोठी झालेली असतात. त्यापैकी डुबेरे येतील भूमिपुत्र व जनता विद्यालयाचे प्राचार्य रामदास वाजे हे स्व- कर्तुत्वाने मोठे झालेले त्यापैकी एक.

डुबेरे येथील सामान्य शेतकरी विष्णू वाजे यांच्या कुटूंबात त्यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९६८ रोजी झाला.

त्यांनी आपले चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे येथे तर माध्यमिक शिक्षण जनता विद्यालय,

डुबेरे येथे पूर्ण केले. त्यांचे माविद्यालयीन शिक्षण सिन्नर येथे झाले. त्यांनी सन १९९२ साली नाशिक येथे बी. एड. पूर्ण केले.

व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असते की चांगल्या ठिकाणी शिक्षकाची नोकरी मिळावी. त्यांना देखील महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेली संस्था मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेत शिक्षक म्हणून नोकरीची संधी मिळाली.या मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले.

त्यांच्या नोकरीची सुरुवात सन १९९४ साली जनता विद्यालय, शिवडे ता- सिन्नर येथून झाली. सेवेत त्यांनी मराठी,

सामाजिकशास्त्र व स्काऊट गाईड विषयाचा चांगला शिक्षक म्हणून नावलौकिक मिळविला. त्यानंतर त्यांची बदली दुसऱ्या शाळेत झाली परंतु या गोष्टीचा आपल्या अध्यापनावर कोणताही परिणाम होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली. त्यांचा स्वभाव अत्यंत मितभाषी, शांत, परिश्रमी, कर्मनिष्ठ , मनमिळावू, एकनिष्ठ , परोपकारी व्यक्तिमत्व असलेला.त्यांना धार्मिक व सामाजिक क्षेत्राची अत्यंत आवड आहे. त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पूर्ण करण्यात नेहमीच अग्रेसर असायचे.

त्यांची अध्यापनावरील एकनिष्ठता व प्रमाणिकपणाचे फळ त्यांना मिळाले. निःपक्षपातीपणे कामामुळे त्यांना सिन्नर तालुक्यातच सेवा करण्याची संधी मिळाली.

अध्यापनाचे काम करत असतानाच स्काऊट गाईड असेल, शालेय उपक्रमातील सांस्कृतिक कार्यक्रमातील विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती असेल अशा सर्व ठिकाणी त्यांनी आपले योगदान दिले .आजही त्यांचे विद्यार्थी मार्गदर्शन घेतात.

त्यांनी उपशिक्षक, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक म्हणून सेवाकार्य केले.मुख्याध्यापक म्हणून त्यांना फक्त दोन वर्षाचा कालावधी मिळाला. या सेवाकार्यात शाळेची सर्वांगीण प्रगती असेल ,पालकांशी सुसंवाद असेल, शिक्षकांच्या समस्या असतील किंवा शाळेची शिस्त असेल या सर्व बाबी मध्ये त्यांनी लक्ष घातले.अतिशय मनमिळाऊ स्वभाव, अचूक काम करून घेण्याची क्षमता, योग्य माणूस - योग्य काम, संस्थेच्या शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीचा वापर करून त्यांनी शाळेला प्रगतीपथावर नेले . विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी त्यांनी जातीने लक्ष घातले.



त्यांनी मराठी व सामाजिक शास्त्र विषयाचे उत्कृष्ट अध्यापन केले. त्यांचे विषयावर प्रभुत्व होते.विषयज्ञान व अध्यापन कौशल्य यांच्या जोरावर त्यांनी मराठी व सामाजिक शास्त्र विषयाच्या इयत्ता १० वीच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली. त्यामुळेच ते विद्यार्थीप्रिय शिक्षक झाले. सेवा करीत असताना सरांनी एस.एस.सी. बोर्डाचे केंद संचालक, परीक्षक , निमायक असे विविध कामे यशस्वीपणे सांभाळलेले आहे.

आपल्या प्रदिर्घ सेवेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले. त्यामुळे त्यांचा पालक संपर्क ही अतिशय मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनी कोनांबे,मिठसागरे ओझर-मिग, सिन्नर,म्हाळसाकोरे,सायखेडा व डुबेरे या ठिकाणी यशस्वीपणे सेवा बजावली आहे. त्यांना लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी तसेच कैलासवासी कुंडलिकराव कोकाटे गुणवंत शिक्षक पुरस्कार देखील मिळालेला आहे. त्यांनी सिन्नर तालुका सेकंडरी टीचर्स सोसायटीचे उपाध्यक्ष म्हणून देखील यशस्वीपणे कामकाज केले आहे. तसेच टी.डी.एफ संघटनेत देखील तालुका व जिल्हा पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटवलेला आहे. मुख्यमंत्री माझी शाळा -सुंदर शाळा या उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी करून आपले आपल्या कामाचा ठसा उमटवला.शालेय पातळीवर त्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम स्काऊट गाईड मेळावे, शालेय विज्ञान प्रदर्शन आदिंसह विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबवले आहे. राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्काऊट गाईड राज्य पुरस्कार तसेच विविध मेळाव्याम ध्ये सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांना पुरस्कार मिळवून दिलेले आहे.तसेच विविध कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेला आहे.राष्ट्रीय कार्यक्रमात देखील त्यांचा सक्रिय सहभाग आहे. जनगणना.आर्थिक सर्वेक्षण

गणना, केंद्रस्तरीय मतदानाधिकारी, मतदान जनजागृती, पल्स पोलिओ लसीकरण अभियान, स्वच्छता अभियान लेक वाचवा अभियान आदिं राष्ट्रीय कामात देखील सहभाग घेऊन यशस्वीपणे कामकाज केले आहे. एक उत्कृष्ट शिक्षक, पर्यवेक्षक,मुख्याध्यापक म्हणून प्रभावीपणे काम केले आहे. त्यांच्या काळात डुबेरे विद्यालयाला भव्य दिव्य असे स्वर्गीय बाळाजी गणपत वाजे सभागृह सिन्नर येथील लोकनेते प्रकाश शेठ वाजे व खासदार राजाभाऊ वाजे यांनी बांधून दिले आहे.

असं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या श्री.वाजे यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात वावरतांना मोठ्या प्रमाणात मित्रपरिवार गोळा केला आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे त्यांच्या अर्धानगीचे अर्थात पत्नीचे योगदान असते.सरांच्या सहचारिणी सौ. सुरेखा याही त्यांच्या पाठीशी भक्कम उभ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना हा शैक्षणिक प्रवास करणे शक्य व सुलभ झाले. त्या एक उत्कृष्ट शिक्षिका म्हणून कामकाज करत आहे.त्यांना दोन मुले आहे व एक मुलगा एमबीए असून तो बंगलोर येथे कार्यरत आहे. तर दुसरा मुलगा इंजिनिअरिंगच्या द्वितीय वर्षाला आहे.

त्यांचे अनेक विद्यार्थी उच्च पदापर्यंत पोहोचले आहेत. त्यांचे शैक्षणिक , सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील योगदान अतिशय महत्वाचे आहे सतत आनंदी , हसतमुख व मितभाषी असलेल्या श्री.वाजे सर यांना सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य अगदी सुखासमाधानाचे ,आरोग्यदायी ,भरभराटीचे जाओ. दीर्घायुष्य लाभो .हीच ईश्वरचरणी मनोकामना !त्यांचे कार्य शैक्षणिक कार्य सदैव स्मरणात राहील.

तुमची सेवा आणि समर्पण सदैव स्मरणात राहील .तुम्हाला सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा! तुमच्या पुढील प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा!

शब्दांकन-श्री.सोमनाथ गिरी (सर)
जनता विद्यालय घोटी

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

१२०० कॅरेट पेरूसह १३ लाखांचा पेरू भरलेला ट्रक सिलीगुडीला पोहोचलाच नाही; १३ लाखांचा माल आणि १५ हजारांचे डिझेलचे पैसेही गेले! चालकाने मारला डल्ला

पिंपळगाव बसवंत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : पिंपळगाव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समिती येथून सिलीगुडी येथे विक्रीसाठी पाठविण्यात आलेल्या तब्बल १३ लाख रुपये किमतीच्या पेरूच्या मालासह ट्रकच गायब झाली आहे. ट्रक चालकाने माल निर्धारित ठिकाणी पोहोचविण्याऐवजी परस्पर घेऊन जाऊन अपहार केल्याप्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलिस ठाण्यात आरोपी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत शादाब मेहताब आलम, वय २६, रा. ए-१५२, पॉकेट एम, जनता फ्लॅट, सरिता विहार, दक्षिण दिल्ली यांनी पिंपळगाव बसवंत पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा दिल्ली येथे फळ खरेदी-विक्रीचा व्यवसाय असून, ते 'न्यू स्टार पोर्ट' या नावाने दुकान चालवितात. या व्यवसायातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचे मित्र मयूर सुनील गांगुर्डे (रा. दिंडोरी) हे फळांचा माल खरेदी करून तो वाहतुकीसाठी ट्रकमध्ये भरून देण्याचे काम करतात. त्यानंतर फिर्यादी ऑनलाइन ब्लॅकबग पच्या माध्यमातून माल पोहोचविण्यासाठी ट्रकची व्यवस्था करतात. दिनांक ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मयूर गांगुर्डे यांनी फिर्यादी यांना फोन करून पेरूचा माल खरेदी केला असून तो ट्रकमध्ये भरण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. त्यानुसार फिर्यादी यांनी ब्लॅकबग पवरून सिलीगुडी येथील सह्याद्री फर्म येथे माल पाठविण्यासाठी ट्रकची मागणी नोंदवली. यानंतर ७४६७०७०५१८ या मोबाईल क्रमांकावरून एका व्यक्तीचा फोन आला. त्याने आपले नाव राजन तिवारी असून आपण गाजीपूर येथील रहिवासी असल्याचे सांगितले. तसेच आपण सध्या नाशिक येथे असल्याचे सांगून माल कोठून भरायचा आहे, अशी विचारणा केली. त्यानंतर त्याने व्हॉट्सपवर ट्रकची कागदपत्रे, चालकाचे वाहन चालविण्याचे परवाना आणि आधारकार्ड पाठवले. त्यामध्ये ट्रकचा क्रमांक यूपी ८३ सीटी ९६८१ असा होता. पाठविलेली कागदपत्रे पाहून फिर्यादी यांनी संबंधित व्यक्तीवर विश्वास ठेवला. सिलीगुडीपर्यंत माल वाहतुकीचे भाडे एक लाख पाच हजार रुपये ठरविण्यात आले. माल निर्धारित ठिकाणी पोहोचल्यानंतर भाडे देण्याचे ठरले. तसेच ट्रक ४८ तासांच्या आत सिलीगुडी येथे पोहोचेल, असे राजन तिवारी याने सांगितले. त्यानुसार फिर्यादी यांनी ट्रक चालकाचा मोबाईल क्रमांक मयूर गांगुर्डे यांना दिला. मयूर यांनी राजन तिवारी याला माल भरण्याचे ठिकाण व लोकेशन पाठविले. दिनांक ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ट्रकमध्ये पेरूचा माल भरण्यात आला. या ट्रकमध्ये पळसे, ता. जि. नाशिक येथून ४०० कॅरेट पेरू भरण्यात आले. या मालाची किंमत चार लाख ३३ हजार ३३३ रुपये होती. प्रत्येक कॅरेटचे अंदाजे वजन दहा किलो होते. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, पिंपळगाव बसवंत येथून ८०० कॅरेट पेरू भरण्यात आले. या मालाची किंमत आठ लाख ६६ हजार ६६६ रुपये होती. अशा प्रकारे एकूण १२०० कॅरेट पेरूचे अंदाजे १२ हजार किलो वजनाचे फळ ट्रकमध्ये भरण्यात आले. या संपूर्ण मालाची किंमत १३ लाख रुपये होती. माल भरल्यानंतर ट्रक सिलीगुडीच्या दिशेने रवाना झाल्याची माहिती मयूर गांगुर्डे यांनी फिर्यादी यांना फोन करून दिली. त्यामुळे माल वेळेत पोहोचेल, असा फिर्यादी यांना विश्वास होता. मात्र, दिनांक ७ ऑक्टोबर रोजी रात्री पावणेबाराच्या सुमारास राजन तिवारी याने फिर्यादी यांना फोन केला. आपण समृद्धी महामार्गावर असून ट्रकमध्ये डिझेल भरण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याचे सांगत त्याने १५ हजार रुपयांची मागणी केली. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी आपल्या न्यू स्टार अकाउंटवरून पेट्रोल पंपाच्या स्कॅनरद्वारे १५ हजार रुपये पाठविले. त्यानंतर दिनांक ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजून १२ मिनिटांनी फिर्यादी यांनी राजन तिवारी याच्या ७४६७०७०५१८ व ९३८९७२१४६० या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधण्याचा



प्रयत्न केला. मात्र, दोन्ही मोबाईल क्रमांक बंद येत होते. त्यानंतर वारंवार फोन करूनही संपर्क होत नसल्याने फिर्यादी यांना संशय आला.

यानंतर दिनांक ९ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांनी ट्रक क्रमांक यूपी ८३ सीटी ९६८१ चा मालक राजवीर सिंह (रा. कथरी, शिकोहाबाद, फिरोजाबाद, उत्तर प्रदेश) याच्या ९४१२७४७३२१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून ट्रकबाबत विचारणा केली. त्यावेळी राजवीर सिंह याने संबंधित ट्रक आपला नसल्याचे सांगितले. त्याने व्हिडिओ कॉल करून ट्रक दाखविल्यानंतर वाहनाचा क्रमांक पाहून फिर्यादी यांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर फिर्यादी यांनी संबंधित ट्रक व चालक राजन तिवारी याची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आजपर्यंत ट्रक तसेच चालकाबाबत कोणतीही ठोस माहिती मिळाली नाही. त्यामुळे राजन तिवारी याने ट्रक ध्ये भरलेला १३ लाख रुपये किमतीचा पेरूचा माल परस्पर घेऊन जाऊन त्याचा अपहार केल्याची खात्री झाल्याचे फिर्यादी यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

१३ लाखांचा माल आणि १५ हजारांचे डिझेलचे पैसेही गेले!

सिलीगुडी येथे माल पोहोचविण्याच्या बहाण्याने ट्रकची व्यवस्था करण्यात आली. मात्र, माल ट्रकमध्ये भरल्यानंतर चालकाने संपर्क तोडल्याने व्यापाऱ्याची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, प्रवासादरम्यान डिझेलसाठी म्हणून आणखी १५ हजार रुपयेही पाठविण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणात ट्रकची खरी आळख, चालकाने सादर केलेली कागदपत्रे आणि माल नेमका कुठे गेला, याबाबत तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकरणी शादाब मेहताब आलम यांच्या फिर्यादीवरून पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात आरोपी राजन तिवारी याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई रवींद्र गुंजाळ पुढील तपास करीत आहेत.

पंढरपूर कॉरिडोर विरोधात बाधित नागरिकांनी दिले नामदेव पायरी ते भक्त निवास, भूसंपादन अधिकाऱ्याकडे लेखी निवेदन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : राज्य शासनाच्या महत्वकांक्षीक्ष पंढरपूर मंदिर परिसरात जतन संवर्धन, या विकास आराखड्यास अंतर्गत कॉरिडोर प्रकल्पाला मंदिर परिसरातील बाधित नागरिकाकडून विरोध वाढताना दिसत आहे घरी दुकाने मालमत्ता बाधित होण्याच्या होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आपल्या हरकती आणि आक्षेप नोंदवण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर आज नामदेव पायरी ते भक्तनिवास असा मोर्चा काढून भूसंपादन अधिकाऱ्याला लेखी निवेदन देण्यात आले.

या मोर्चामध्ये दिल्ली येथील वकील जगदीश शेट्टी उपस्थित होते. त्यांनी बाधित नागरिकाची संवाद साधताना प्रकल्पा विरोधात लढा लोकशाही मार्गाने आणि न्यायालयीन प्रक्रिया द्वारे लढण्याची आव्हान केले. आगामी निवडणुकीतून मतदानातूनभाजपला मतदानापासून भाजप सरकारला विरोध दर्शविण्याची आव्हान केले त्यामुळे मोर्चाला राजकीय वरण मिळण्याची चर्चा सुरू आहे.

रपूर परिसरात प्रथम संवर्धन आणि विकास आराखड्या अंतर्गत कॉरिडॉर उभारण्याची प्रक्रिया शासनाकडून सुरू आहे. या प्रकल्पासाठी बाधित होणाऱ्या नागरिकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात आली आहे.

ा मुदतीच्या पार्श्वभूमीवर बाधित नागरिकांनी एकत्र येऊन नामदेव पायरी पासून भक्तनिवास येथे जाऊन जाऊन भूसंपादन अधिकारी क्रमांक तीन संतोष कुमार देशमुख यांच्याकडे आपले लेखी म्हणजे आणि हरकती सादर करण्यात आल्या.

ावेळी उपस्थित दिल्ली येथील वकील जगदीश शेट्टी यांनी बाधित नागरिकांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की एखादा प्रकल्प नागरिकांवर लादला जात असेल, त्यांच्याविरोधी लोकशाही मार्गाने आवाज उठवणे आवश्यक आहे. आगामी निवडणुकीत मतदानापासून भाजपला विरोध करत अशा प्रकल्पाबाबत जनतेची भूमिका काय आहे हे दाखवून द्या,

या मार्फत २०० नागरिकांनी संपर्क केला भूसंपादन अधिकारी ची माहिती.

मोर्चेकरांनी लेखी हरकती सादर केल्यानंतर भूसंपादन अधिकारी तीन संतोष कुमार देशमुख यांनी नागरिकांची सव्वासाताला व आतापर्यंत त्यांनी सुमारे १५० नागरिकांनी आमच्याशी संपर्क साधला आहे. त्यापर्यंत जवळजवळ ५० टक्के नागरिकांनी संमती दर्शविल्याची माहिती त्यांनी दिली व संमती दिलेले नागरिकांना मालमत्तेचे मोजमाप करून त्यांच्या



घराच्या आणि मालमत्तेची मोजमाप करून त्यांची किंमत निश्चित करण्याची प्रक्रिया पुढे केली जाईल.

ऑर्डरच्या विरोधात दोन भूमिका समोर

पंढरपूर कॉरिडॉर मध्ये मंदिर समितीचा विकास व भाविकांसाठी सुविधा व धार्मिक फलटणला चालना मिळण्याची अपेक्षा, शासनाकडून व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे मधील समाजातील बाधित नागरिकांकडून आपल्या घराचा व्यवसायचा आणि पारंपारिक, वास्तव्याचा प्रश्न सतावत आहे. प्रकल्पाच्या समर्थनात व विरोधात अशा दोन्ही भूमिका समोर येत आहेत. बातम्या नागरिकांच्या अर्कती ऐकून घेणे व त्यांना योग्य मोबदला निश्चित करणे, आणि पुनर्वसनाच्या भूमिकेवर स्पष्ट भूमिका घेणे. ही प्रशासना समोरील महत्वाचे आव्हान आहे.

ग्रामपंचायत बऱ्हाणपूर येथे संविधान दिन साजरा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बऱ्हाणपूर प्रतिनिधी/उत्तम बनसोडे : आज २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिनानिमित्त ग्रामपंचायत बऱ्हाणपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन श्री. राजकुमार बनसोडे व बाशाभाई पिरजादे यांच्या हस्ते करण्यात आले व संविधान प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले यावेळी उपस्थित उत्तम बनसोडे, सरकारपाशा पिरजादे, सर्फराज फुलारी, प्रकाश नागेशी, विजय विजापूरे, मैनोद्दीन पटेल, अ.करीम पिरजादे, गजानंद नागेशी,महमद पिरजादे, प्रकाश बनसोडे, मंजुनाथ बनसोडे आदी उपस्थित होते.

कडबगाव भीमनगर येथे संविधान दिन उत्साहात साजरा



संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन; समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची मूल्ये जपण्याचा संकल्प

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कडबगाव : कडबगाव येथील भीमनगरमध्ये भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधानाने दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये समाजात रुजविण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करून संविधानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. लोकशाही बळकट करण्यासाठी संविधानातील हक्क आणि कर्तव्यांची जाणीव प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास अनिल सोनकांबळे (मा. उपसरपंच), सुभाष शिवशरण, विकास बनसोडे, शरण गायकवाड, धनराज बनसोडे, सोहेल भुताळी दर्शन रेउरे, प्रज्वल सोनकांबळे, अविनाश बनसोडे, साहिल रेउरे, सागर रेउरे, सचिन बनसोडे, भागेश बनसोडे, नैतिक बनसोडे आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले अभिनंदन

चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षात शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची निवड अभिमानास्पद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा बहुमान आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ साहित्यीक विचारवंत डॉ. शरणकुमार लिंबाळे यांना प्राप्त झाल्याबद्दल संबंध आंबेडकरी चळवळीला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदारतळे येथे केलेल्या सत्याग्रहाच्या क्रांतीला यंदा शंभर वर्ष पूर्ण होत आहे. चवदारतळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षात शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदाचा बहुमान आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ साहित्यीक डॉ.शरणकुमार लिंबाळे



यांना मिळणे हा सुवर्ण क्षण दुग्धशर्करा योग आहे. या निवडीबद्दल अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे आणि सर्व साहित्यीकांचे आपण मनःपूर्वक अभिनंदन करीत आहोत असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

शरणकुमार लिंबाळे हे सोलापुर जिल्हयातुन पुढे आले. सोलापुर जिल्हयात त्यांनी दलित पँथरचे संघटन वाढविण्यात मोठे योगदान दिले. दलित पँथर चळवळीमध्ये त्यांनी चांगले काम केले आहे. दलित पँथर; भारतीय दलित पँथर तसेच रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीला वैचारीक बैठक मिळवुन देण्यामध्ये डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी नेहमीच रिपब्लिकन पक्षाच्या संमेलनामध्ये कार्यकर्त्यांना वैचारिक मार्गदर्शन केलेले आहे. त्यांचे जीवन अत्यंत खडतर आणि जातीभेदाच्या वणवा सोसणारे राहिले आहे. त्यांनी आपले अनुभव अक्करमाशी या त्यांच्या आत्मकथनातुन जगासमोर मांडले. त्यांचे अक्करमाशी हे आत्मकथन जगप्रसिध्द आहे. ते अनेक भाषांत अनुवादीत झालेले आहे. अलिकडेच त्यांनी लिहीलेल्या सनातन कादंबरीला अत्यंत सन्मानाचा सरस्वती राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांनी दलित पँथर आणि रिपब्लिकन चळवळीवरही पुस्तके लिहली आहेत. त्यांची अनेक पुस्तके गाजली आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडरांच्या विचारांवर श्रध्दा असणारे प्रचंड अभ्यास असणारे विचारवंत आणि साहित्यीक म्हणुन डॉ. शरण कुमार लिंबाळे आंबेडकरी चळवळीमध्ये लोकप्रिय आहेत. सुरुवातीच्या काळात त्यांनी दलित पँथर, भारतीय दलित पँथर मध्ये आमच्यासोबत काम केले आहे. महाराष्ट्रात मी मंत्री असतांना त्यांनी माझ्यासोबत माझ्या मंत्रालयात काम केलेले आहे. ते माझ्या अत्यंत जवळचे मित्र, जवळचे सहकारी आहेत. त्यांना चवदारतळे शताब्दी सत्याग्रहाच्या वर्षात मराठी साहित्य संमेलनाच्या शंभराव्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा मान मिळाला. ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे, असे ना. रामदास आठवले म्हणाले.

ापूर्वी अस्मितादर्शकार डॉ. गंगाधर पाणतावने यांना विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा बहुमान मिळाला होता. त्यानंतर आता अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या शंभराव्या साहित्य संमेलनाचा बहुमान

डॉ.शरणकुमार लिंबाळे यांना प्राप्त झालेला आहे. ही आंबेडकरी चळवळीसाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. असे ना. रामदास आठवले यांनी सांगत डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे अभिनंदन केले आहे.

आंबे येथील विहीर दुर्घटनेची दंडाधिकारी चौकशी

नागरिक, नातेवाईक व प्रत्यक्षदर्शींना ३ डिसेंबर रोजी निवेदन व पुरावे सादर करण्याचे आवाहन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : मौजे आंबे, ता. पंढरपूर येथील गट क्रमांक १९६/१ब मधील विहिरीचे काम सुरू असताना दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी विहीर कोसळून चार मजुरांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १९६ अन्वये दंडाधिकारी चौकशी करण्यात येत आहे.

या दुर्घटनेत आबासो भिवा घोडके (वय ५५, रा. अनवली), तानाजी नानासो घोडके (वय ५९, रा. अनवली), सिद्धेश्वर दत्तू घाडगे (वय ४६, रा. रांझणी) आणि मंगेश गोविंद मोरे (वय ३८, रा. रांझणी) या चार मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांच्या आदेश क्रमांक २०२६/डीसीबी-४/आरआर-६८४/२६, दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ अन्वये सदर दुर्घटनेची सखोल दंडाधिकारी चौकशी करून सात दिवसांच्या आत अहवाल सादर करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या अनुषंगाने सदर दुर्घटनेबाबत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष माहिती असलेल्या नागरिकांनी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी, मृत मजुरांच्या कायदेशीर वारसांनी व नातेवाईकांनी तसेच संबंधित शासकीय व निमशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपले लेखी अथवा तोंडी निवेदन, साक्ष, पुरावे व संबंधित कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे. संबंधितांनी दिनांक ३ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, पंढरपूर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे व पुरावे सादर करावेत.

विहित मुदतीत कोणाचेही निवेदन अथवा साक्ष प्राप्त न झाल्यास, संबंधितांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून उपलब्ध कागदपत्रे व पुराव्यांच्या आधारे चौकशी पूर्ण करून अंतिम अहवाल जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांच्याकडे सादर करण्यात येईल, असे जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात आले आहे.

कार्तिकी यात्रेत १५ दिवसांत ७ लाखहून अधिक भाविकांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

दररोज सरासरी ४८ हजार ७५३ भाविकांची उपस्थिती; कार्तिकी एकादशीच्या दिवशी ५९ हजार ५७१ भाविकांनी घेतले दर्शन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून तसेच परराज्यांतून मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. दि. १० ते २४ नोव्हेंबर या १५ दिवसांच्या यात्रा कालावधीत एकूण ७ लाख ३१ हजार २९८ भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यामध्ये ३ लाख १४ हजार २२ भाविकांनी पदस्पर्श दर्शनाचा, तर ४ लाख १७ हजार २७६ भाविकांनी मुखदर्शनाचा लाभ घेतल्याची माहिती कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

यंदाच्या कार्तिकी यात्रेत भाविकांना सुलभ, सुरक्षित व शिस्तबद्ध दर्शन मिळावे, यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले होते. दर्शन व्यवस्थेसाठी अनुभवी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच दर्शन व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी मंदिर समितीच्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांची पर्यवेक्षण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव व व्यवस्थापक प्रविणकुमार घम हे स्वतः दर्शन रांगेमध्ये फिरते राहून वेळोवेळी सूचना देत होते. पदस्पर्श दर्शन व मुखदर्शनासाठी स्वतंत्र दर्शन रांगा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शन व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्यात आले होते. याशिवाय दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या नोंदणीसाठी कॅमेरा बसवण्यात आलेला आहे.

दर्शन रांगेतील भाविकांना अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रांगेत बसण्याची व्यवस्था, मॅटची सुविधा, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था, खिचडी वाटप आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच आवश्यक ठिकाणी पंखे व कुलर बसविण्यात आले होते. भाविकांना रांगेतूनच श्रींचे लाईव्ह दर्शन घेता यावे, यासाठी लाईव्ह दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. लाऊडस्पीकरच्या माध्यमातून भक्तिगीते प्रसारित करण्यात येत होती. याशिवाय भाविकांच्या आरोग्याची काळजी



घेण्यासाठी आवश्यक आरोग्यविषयक सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यात्रा कालावधीत भाविकांना २४ तास दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

या १५ दिवसांच्या कालावधीत पदस्पर्श दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या एकूण भाविकांच्या ४२.९४ टक्के, तर मुखदर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या ५७.०६ टक्के इतकी आहे. पदस्पर्श दर्शनाच्या तुलनेत मुखदर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या १ लाख ३ हजार २५४ ने अधिक आहे. यात्रा कालावधीत दररोज सरासरी ४८ हजार भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले.

कार्तिकी यात्रेतील महत्त्वाचा सोहळा असलेल्या दि. २१ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशीच्या दिवशी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. या दिवशी एकूण ५९ हजार ५७१ भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. यामध्ये २५ हजार २०९ भाविकांनी पदस्पर्श दर्शनाचा, तर ३४ हजार ३६२ भाविकांनी मुखदर्शनाचा लाभ घेतला.

यात्रा कालावधीमध्ये दि. २२ नोव्हेंबर रोजी सर्वाधिक ६० हजार ९४८ भाविकांनी दर्शन घेतले, तर दि. ११ नोव्हेंबर रोजी सर्वात कमी ३७ हजार १३६ भाविकांनी दर्शन घेतले.

कार्तिकी यात्रेच्या कालावधीत लाखो भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. भाविकांना सुलभ, सुरक्षित व समाधानकारक दर्शन उपलब्ध करून देण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आलेले नियोजन आणि उपलब्ध करून दिलेल्या विविध सुविधांमुळे यात्रा कालावधीत दर्शन व्यवस्था सुरळीतपणे पार पडल्याची यावेळी व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले.

नैताळे येथे गावठी कट्ट्यातून गोळीबार; एक जण गंभीर जखमी, संशयित फरार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



निफाड/प्रतिनिधी : राज्यात गोळीबाराच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असतानाच निफाड तालुक्यातील नैताळे येथे गोळीबाराची धक्कादायक घटना घडली आहे. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास गावठी कट्ट्यातून गोळीबार करण्यात आला. या घटनेत श्रावण सुरेश पिंपळे अंदाजे वय ३३ हा तरुण गंभीर जखमी झाला असून, घटनेमुळे संपूर्ण नैताळे गावात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, श्रावण सुरेश पिंपळे आणि राहुल वाघमारे हे दोघे नैताळे गावातील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या वडाच्या झाडाखाली थांबले होते. यावेळी संभाजीनगर येथे दाखल असलेल्या एका गुन्ह्याच्या संदर्भात त्यांच्यात चर्चा सुरू होती. त्याचदरम्यान गावठी कट्ट्यातून गोळी झाडण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या गोळीबारात श्रावण पिंपळे याच्या पाठीमागील बाजूसश्र कमरेजवळ गोळी लागली.गोळी लागल्याने श्रावण पिंपळे याला तातडीने निफाड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारांसाठी त्याला नाशिक येथील मेडीग्राम हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे. श्रावण या जखमीला रुग्णालयात दाखल केल्यानंतर गोळीबाराच्या घटनेची माहिती समोर आली. माहिती मिळताच निफाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी गुन्हे अन्वेषण पथक / फॉरेन्सिक पथकही दाखल झाले असून, गोळीबार झालेल्या ठिकाणची पाहणी करून पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे.या घटनेनंतर गोळीबार केल्याचा संशय असलेला अहिल्यानगर येथील राहुल वाघमारे हा घटनास्थळावरून फरार झाला आहे. त्याचा शोध घेण्यासाठी निफाड पोलिसांकडून पथके रवाना करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.नैताळेसारख्या गावात भरदिवसा गावठी कट्ट्यातून गोळीबार झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गोळीबारामागील नेमके कारण काय..?, संभाजीनगर येथील गुन्ह्याचा या घटनेशी काय संबंध आहे आणि गोळीबारासाठी वापरण्यात आलेला गावठी कट्टा कुठून आणण्यात आला, याचा तपास आता निफाड पोलीस करीत आहेत. दरम्यान या घटनेमुळे नैताळे शहर व परिसरातील नागरिक भयभीत झाली असून परिसरामध्ये सर्रासपणे वारंवार छोट्या मोठ्या घटना घडत असून परिसरात अवैध धंद्याचा सुळसुळाट झाला असल्याने गुन्हेगारांचा वावर वाढला आहे याबाबत पोलिसांनी दखल घेण्याची गरज ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अहिल्यादेवी होळकरांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान : प्रा. रोहिदास शिंदे

निफाड येथे व्यक्तिमत्त्व व कार्यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान

निफाड/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कर्तृत्वातून केवळ राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला नाही, तर लोककल्याण, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि विकासाभिमुख प्रशासनाचा वस्तुपाठ घालून दिला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक जडणघडणीत त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. रोहिदास शिंदे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळ आणि श्री माणकेश्वर वाचनालय, निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड येथे आयोजित व्याख्यानात दुसरे पुष्पगुफतांना ते बोलत होते. यावेळी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा विविध पैलूंनी आढावा घेतला.महाराष्ट्राच्या इतिहासात अहिल्यादेवींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राज्यकारभाराचे धडे घेतले. पती खंडेराव होळकर आणि पुत्र मालेराव यांच्या निधनानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थिती त्यांनी राज्याची धुरा समर्थपणे सांभाळली. इ.स. १७६७ ते १७९५ या कालखंडात त्यांनी महेश्वर येथून राज्यकारभार चालविला. न्यायप्रियता, प्रजाहितदक्षता आणि पारदर्शक प्रशासन ही त्यांच्या कारभाराची प्रमुख वैशिष्ट्ये होती.अहिल्यादेवींनी महाराष्ट्रातील महेश्वरला आपल्या राज्यकारभाराचे आणि सांस्कृतिक कार्याचे महत्त्वाचे केंद्र बनविले. महेश्वर येथे घाट, मंदिरे, धर्मशाळा आणि सार्वजनिक सुविधांची उभारणी केली. महेश्वरी वस्त्रउद्योगाला प्रोत्साहन देऊन विणकर, कारागीर आणि स्थानिक उद्योगांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. नर्मदा नदीच्या तीरावरील महेश्वरचा विकास करताना त्यांनी धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन केले.त्यांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते. देशभरातील अनेक तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार, मंदिरांची उभारणी, घाट, विहिरी, तलाव आणि धर्मशाळांची निर्मिती करून त्यांनी लोककल्याणाचा व्यापक दृष्टिकोन जपला. काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीतील त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. समाजातील सर्व घटकांना न्याय मिळावा, शेतकरी आणि सामान्य जनतेचे हित जपले जावे, यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील होत्या. संकटाच्या काळात जनतेला आधार देणे आणि प्रशासनात कर्तव्यनिष्ठेला प्राधान्य देणे, ही त्यांच्या नेतृत्वाची ओळख होती. अशी शेवटी शिंदे यांनी सांगितले या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे सुधाकरराव कापसे होते.व्यासपीठावर श्री मणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, संचालक विजयराव धाररावं, निफाडचे माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर, नगरसेवक किशोर ढेपले आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे सरचिटणीस सुनील चिखले यांनी केले. त्यांनी बहिःशाल शिक्षण मंडळाच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानमालेचा उद्देश आणि वाचनालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली.सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी मानले. अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा इतिहास, त्यांचे लोकाभिमुख प्रशासन आणि समाजकल्याणाचा दृष्टिकोन जाणून घेण्याची संधी या व्याख्यानातून उपस्थितांना मिळाली.

पंढरीत भरणार पहिले योगशिक्षक संमेलन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



पंढरपूर : श्री संत नामदेव सेंटर, वैराग आणि आरोग्यवर्धिनी योग शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर येथे पहिल्या योग शिक्षक संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वैराग येथील योग महाविद्यालयाचे प्रा. दत्तात्रय उंडाळे यांनी दिली.

हे संमेलन शनिवार २८ व रविवार २९ रोजी मनमाडकर मंडप येथे संपन्न होणार आहे. राज्यातील योग शिक्षकांना एका व्यासपीठावर आणणे, योगाचे महत्त्व समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करणे हा या दोन दिवसीय संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. संमेलनास २ हजार योगशिक्षक उपस्थित राहणार आहेत.

याचे उद्घाटन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक चैतन्य महाराज देगलूरकर, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे उपस्थितीत होणार आहे.

संमेलनामध्ये योगाभ्यास, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि योग शिक्षकांच्या विविध विषयांवर चर्चासत्रे पार पडणार आहेत.

सदर पहिल्या योग शिक्षक संमेलनास राज्यातील सर्व योग शिक्षक, साधक आणि योगप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दत्तात्रय उंडाळे यांनी केले आहे.

संविधानाचा विचार आता डिजिटल माध्यमातून तरुणांपर्यंत!

विवेक विचार मंच, सोलापूर शाखेतर्फे Gen Z साठी रिल्स स्पर्धेचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : भारतीय संविधानातील मूल्ये, लोकशाही विचार, मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव नव्या पिढीमध्ये निर्माण व्हावी, तसेच तरुणांनी संविधानाचा विचार आधुनिक डिजिटल माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवावा, या उद्देशाने विवेक विचार मंच, सोलापूर शाखेच्या वतीने संविधान दिनानिमित्त ऋणशपशीर-ींळेप न (ऋणप न) तरुणांसाठी विशेष रिल्स स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

आजची ऋणप न पिढी ही डिजिटल तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि सर्जनशील अभिव्यक्तीमध्ये आघाडीवर आहे. या तरुणांच्या कल्पकतेला व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही या मूल्यांचा प्रसार करण्याचा या स्पर्धेचा मुख्य हेतू आहे.

या स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धकांना भारतीय संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधाननिर्मितीतील योगदान, मूलभूत अधिकार व कर्तव्ये, महिला सक्षमीकरण, सामाजिक समता, लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संविधानातील मानवी मूल्ये अशा विविध विषयांवर आकर्षक व आशयपूर्ण रिल्स तयार करता येतील.

'संविधान समजून घेऊया, डिजिटल माध्यमातून समाजाला सांगूया!' या संकल्पनेतून आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा तरुणांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच डिजिटल माध्यमांचा सकारात्मक आणि विधायक वापर करण्यास प्रोत्साहन देणारी ठरणार आहे.

रिल्स पाठविण्याचा कालावधी २६ नोव्हेंबर २०२६ ते ६ डिसेंबर २०२६ दरम्यान असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस तसेच तीन उत्तेजनार्थ बक्षीस व सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सोलापूरमधील महाविद्यालयीन विद्यार्थी व ऋणप न तरुणांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती अश्विनीताई चव्हाण, जिल्हा संयोजिका विवेक विचार मंच, सोलापूर यांनी केले आहे. अधिक माहिती साठी व रील्स



पाठविण्यासाठी प्रा.डॉ.धानेश लिगाडे ९९६०९९४४८४ व श्री. सिद्धांत बाबरे ९९२२२२१८९४ यांच्याशी संपर्क साधावे.

कल्याणशेट्टी महाविद्यालयात संविधान दिन व शहिदांना श्रद्धांजली कार्यक्रम

विद्यार्थ्यांनी संविधानिक तत्वांनुसार विकसित भारताचे स्वप्न पहावे : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



अक्कलकोट : डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे देशाची चौफेर प्रगती झाली आहे. प्रगत दळणवळणाच्या साधनातून उद्योग- व्यवसाय भरभराटीस आले आहेत. विकासाचा दर वाढला आहे. देशात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता प्रस्थापित झाली आहे, अशा स्थितीत विद्यार्थ्यांनी विघातक शक्तींना धडा शिकवण्यासाठी संविधानिक तत्वानुसार विकसित भारताचे स्वप्न पहावे .असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने संविधान दिन व शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ.विठ्ठल वाघमारे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, डॉ आंबेडकर यांच्या संविधानामुळे दुर्लक्षित समाजाची प्रगती झाली आहे. शहीदांनी दिलेल्या बलिदानामुळे देशात शांतता नांदत आहे म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण केले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.आर.लोखंडे यांनी केले सूत्रसंचालन प्राध्यापिका डॉ. शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले. प्रा.सौरभ भस्मे यांनी संविधान उद्देशिकाचे वाचन केले. आभार प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. गुरुशांत हपाळे,सचिन फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी, प्रा.शितल फुटाणे, प्रा.सविता स्वामी उपस्थित होते.

प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना श्रद्धांजली

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, ताज हॉटेल, ओबेराय हॉटेल, कामा रुग्णालय आणि नरिमन हाऊस येथे झालेला दहशतवादी हल्ल्यात निरापराध नागरिक पोलीस अधिकारी आणि सुरक्षा जवानांनी आपले प्राण गमावले त्यांना उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली.

शहिदांचे स्मरण अन डोळ्यात अश्रू

पोलीस अधिकारी हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, मेजर संदीप उन्नीकृष्णनन, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम ओंबाळे यांनी दहशतवादी अजमल कसाबला जिवंत पकडण्यासाठी स्वतःच्या प्राणाची आहुती दिली. हा हृदयदावक प्रसंग मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी कथन करताच उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू तरळले.